0 9 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय व्यवस्थापक राजीव कुमार सिंग आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते 'कोल्हापूर जिल्ह्यातील पोस्ट ऑफिसेसच्या माध्यमातून आर्थिक समावेशन' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी शेजारी डॉ. प्रमोद पाटील, श्रीकृष्ण महाजन, प्रताप खोत, केदार मारुलकर आदी उपस्थित होते.

# समाज विकासासाठी विद्यापीठ, वित्तीय संस्थांनी एकत्र यावे : सिंग

## डॉ. प्रताप खोत, केदार मारुलकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : 'शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि सर्वसामान्यांना आर्थिक साक्षर करणे ही काळाची गरज आहे. समाजाच्या उत्कर्षासाठी विद्यापीठ आणि वित्तीय संस्था यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय व्यवस्थापक राजीव कुमार सिंग यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये आयोजित डॉ. प्रताप खोत आणि डॉ. केदार मारुलकर लिखित 'कोल्हापूर जिल्ह्यातील पोस्ट ऑफिसेसच्या माध्यमातून आर्थिक समावेशन' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

सिंग म्हणाले, 'भारतीय बँका आणि डाक घरे हे आर्थिक समावेशन योजनांद्वारे समाजाचा विकास करण्याची जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांचे समाजाच्या विकासातही मोठे योगदान आहे.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'देशाच्या विकासात डाक घरांचे मोठे योगदान आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांकडून संशोधन प्रबंधांचे रूपांतर पुस्तक प्रकाशामध्ये होणे ही बाब समाज हिताच्यादृष्टीने विद्यापीठासाठी भूषणावह आहे. काही प्रमाणात सामान्य जनतेपर्यंत विविध योजना पोहोचण्यासाठी डाकघरांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असून, त्यासाठी हे पुस्तक निश्चित उपयुक्त ठरेल.'

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. राजन पडवळ, दीपा इंगवले, कविता वड्राळे, संतोष सुतार, वैशाली भोसले, अमोल कांबळे, तेजपाल मोहारेकर, तेजस्विनी मोहारेकर, शोभा चाळके, पल्लवी कोडक, आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

0 9 DEC 2023 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बँका, डाकघराचे समाजविकासात योगदान

## राजीवकुमार सिंग : शिवाजी विद्यापीठात पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतीय बँका आणि डाकघरे आर्थिक समावेशन योजनांद्वारे समाजाच्या विकासाची जबाबदारी पार पाडत आहेत. यात त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय व्यवस्थापक राजीवकुमार सिंग यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहात आयोजित डॉ. प्रताप खोत आणि डॉ. केदार मारूलकर लिखित 'कोल्हापूर जिल्ह्यातील पोस्ट ऑफिसेसच्या माध्यमातून आर्थिक समावेशन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



डॉ. प्रताप खोत, डॉ. केदार मारुलकर लिखित 'कोल्हापूर जिल्ह्यातील पोस्ट ऑफिसेसच्या माध्यमातून आर्थिक समावेशन' या पुस्तकाचे प्रकाशन राजीवकुमार सिंग व डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून संशोधन प्रबंधांचे रूपांतर पुस्तकामध्ये होणे ही बाब समाजहिताच्या दृष्टीने विद्यापीठासाठी भूषणावह आहे.

डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. राजन पडवळ, डॉ. दीपा इंगवले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. वैशाली भोसले, डॉ. अमोल कांबळे, डॉ. तेजपाल मोहारेकर, डॉ. तेजस्विनी मोहारेकर, डॉ. शोभा चाळके, डॉ. पल्लवी कोडक उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

09 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मास कम्युनिकेशनच्या ' मीडिया स्प्रेक्ट्रम ' चे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थ्यांनी गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवावर आधारित तयार केलेल्या मीडिया स्पेक्ट्रम या विशेषांकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये करण्यात आले.



'मीडिया स्पेक्ट्रम 'च्या चित्रपट महोत्सव विशेषांकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के सोबत मान्यवर.

प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभाग नोंदवला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध देशातील चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेत्यांशी चर्चा करून माहिती संकलित केली होती. या माहितीचे संकलन असलेला मीडिया स्पेक्ट्रम हा विशेषांक विद्यार्थ्यांनी तयार केला. या अंकाचे संपादन डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे. यावेळी कुलगुरू प्रा. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करून जनसामान्यांशी संवाद साधला पाहिजे. मुद्रीत माध्यमांबरोबरच इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांचा उपयोग विद्यार्थ्यांनी करावा. चित्रपट महोत्सवात सहभागी साईसिमरन घाशी, मेलीना कालिचुर्ण, सूरज कांबळे, अथर्व यज्ञोपवित, दिव्या कांबळे, सचिन बनसोडे यांनी अनुभव सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. प्रसाद ठाकूर आदी उपस्थित होते.

## 'स्क्रिप्ट टू स्क्रीन'वर आज विद्यापीठात कार्यशाळा

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभाग तसेच पद्मश्री डॉ. ग. गो जाधव पत्रकारिता अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने स्क्रिप्ट टू स्क्रीन या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा शनिवार दि. ९ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० ते ४.३० या वेळेत होणार आहे. पुणे येथील प्रसिद्ध दिग्दर्शक आणि पडद्यामागची गोष्ट या पुस्तकाचे लेखक सुनील नाईक कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या नवीन इमारतीमध्ये होत आहे, अशी माहिती मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

0 9 DEC 2023

सत्यवादी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठामध्ये कचऱ्यापासून केली गांडूळ खत निर्मिती



कोल्हापूर, ता. ७ : कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरामध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती केली आहे.आज कुलगुरू डी.टी.शिर्के यांच्या हस्ते पहिल्या बेडचे खत वितरीत करण्यात आले. यावेळी प्र.कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे,उपकुलसचिव श्री.अरुण ढेरे,समन्वयक डॉ.आर.जी.पवार अधिसभा सदस्य धैर्यशील यादव उपस्थित होते.

कचरा व्यवस्थापन या संदर्भात एक बैठक आयोजित केली होती.त्यावेळी त्यांनी केंद्राचे समन्वयक डॉ.आर.जी.पवार यांना या संदर्भात सूचना केल्या होत्या.यावर डॉ.पवार यांनी एक या प्रकल्पाची समिती नेमून त्यावर काम सुरु केले.या समिती मध्ये पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ.असावरी जाधव ,उद्यान अधीक्षक श्री.अभिजित जाधव,स्वच्छता निरीक्षक श्री.शशिकांत साळुंखे हे सदस्य म्हणून वेळोवेळी काम पाहत होते व मार्गदर्शन करत होते विद्यापीठामध्ये रोज निर्माण होणारा पालापाचोळा,वसतिगृहातील खराब झालेल्या भाज्या हे सर्व एकत्रित करून त्यावर योग्य ती प्रक्रिया करून हे खत निर्माण केले आहे .यामुळे विद्यापीठ परिसरातील कचऱ्याचे योग्य पद्धतीने विल्हेवाट होत आहे.

माजी जिल्हा कृषी अधिकारी श्री.लतीफ शेख हे तज्ञ व्यक्ती म्हणून काम पाहत होते, कौशल्य विकास अधिकारी श्री.प्रमोद कांबळे यांनी प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
तरुण भारत
0 9 DEC 2023

# पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातीलं विदेशी भाषा विभाग आणि 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को ऑपरेशन अँड लँग्वेज, लिस्बन, पोर्तुगाल या दोन संस्थांमध्ये नुकताच सामंजस्य करार झाला. त्या अंतर्गत शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम आठवड्यातून ६ तास शिकवला जाईल. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

- इच्छुकांनी प्रवेश घ्यावे: डॉ. मेघा पानसरे यांचे आवाहन

महाराष्ट्रात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम असणारी शिवाजी विद्यापीठ ही एकमेव संस्था आहे. या अभ्यासक्रमाचा लाभ कोल्हापुरातील महाविद्यालयांत, तसेच विद्यापीठातील सर्व अधिविभागांत विविध विद्याशाखांत इतर अभ्यासक्रम करणारे विद्यार्थी, विशेषतः इतिहास विषयाचे विद्यार्थी-संशोधक, शिक्षक-अभ्यासक, व्यापार क्षेत्रातील लोक घेऊ शकतात. पोर्तुगीज भाषा, तिच्या इतिहास आणि संस्कृतीप्रमाणेच एक समृद्ध भाषा आहे. ती जगातील सहावी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांडूळ खताच्या पहिल्या बेडचे वितरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव अरुण ढेरे, समन्वयक डॉ. आर. जी. पवार अधिसभा सदस्य धैर्यशील यादव आदी.

# विद्यापीठात कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरामध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती केली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पहिल्या बेडचे खत वितरीत करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव अरुण ढेरे, डॉ. आर. जी. पवार, धैर्यशील यादव उपस्थित होते.

कचरा व्यवस्थापन या संदर्भात बैठक आयोजिली होती. केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. पवार यांना यासंदर्भात सूचना केल्या होत्या. यावर डॉ. पवार यांनी प्रकल्पाची समिती नेमून काम सुरु केले. समितीमध्ये पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, उद्यान अधीक्षक अभिजित जाधव, स्वच्छता निरीक्षक शशिकांत साळुंखे सदस्य होते. विद्यापीठामध्ये रोज निर्माण होणारा पालापाचोळा, वसतिगृहातील खराब भाज्या एकत्रित करून त्यावर योग्य ती प्रक्रिया करून खत निर्माण केले आहे. माजी जिल्हा कृषी अधिकारी लतीफ शेख तज्ज्ञ म्हणून काम पाहत होते. कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 DEC 2023

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

वारणानगर,ता.७(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सन २०२१-२२ या सालचा शिवाजी विद्यापीठा अंतर्गत नियतकालिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र. कुलगुरू प्रा.डॉ.पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ परीक्षा विभाग प्रमुख, डॉ. ए. एन. जाधव व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.



कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य,डॉ.एस.व्ही.आणेकर,डॉ.बी.टी.साळोखे व प्रा.ना.श्री. धाराशिवकर व इतर मान्यवर.

यामध्ये वारणानगरच्या महाविद्यालयाच्या होरायझन या तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी नियतकालिकेने व्यावसायिक महाविद्यालय गटात प्रथम क्रमांक पटकावला. सदर नियतकालिकेस सलग दुसऱ्या वर्षी हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.तसेच नियतकालिकामधील विविध विभागा मधून विद्यार्थ्यांनी वैयक्तिक २२ पारितोषिके पटकावली आहेत. हा पुरस्कार संस्थेच्यावतीने प्राचार्य. डॉ. एस. व्ही. आणेकर व प्रा. ना.श्री.धाराशिवकर यांनी स्वीकारला. ह्या समारंभास महाविद्यालयाचे प्रा.पी.व्ही. लोखंडे,डॉ.मार्क मोनिस,प्रा.ए.आर. चौगुले, प्रा. बी.ए.चौगुले आणि प्रा.एस.सविता उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 DEC 2023
सत्यवादी

Scanned with OKEN Scanner

# पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम प्रवेश सुरु

कोल्हापूर, ता. ७ : विदेशी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर कोऑपरेशन अँड लँग्वेज, लिस्बन, पोर्तुगाल या दोन संस्थांमध्ये नुकताच सामंजस्य करार झाला. त्या अंतर्गत शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु होत आहे. हा अभ्यासक्रम सायंकाळी, आठवड्यातून तास या पद्धतीने असेल. या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागातर्फे करण्यात येत आहे.

महाराष्ट्रात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम असणारी शिवाजी विद्यापीठ ही एकमेव संस्था आहे. या अभ्यासक्रमाचा लाभ कोल्हापुरातील महाविद्यालयांत, तसेच विद्यापीठातील सर्व अधिविभागांत विविध विद्याशाखांत इतर अभ्यासक्रम करणारे विद्यार्थी, विशेषत: इतिहास विषयाचे विद्यार्थी-संशोधक, शिक्षक- अभ्यासक, व्यापार क्षेत्रातील लोक घेऊ शकतात.

पोर्तुगीज भाषा, तिच्या इतिहास आणि संस्कृतीप्रमाणेच एक समृद्ध भाषा आहे. ती जगातील सहावी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. पोर्तुगाल बरोबरच ब्राझील, अंगोला, केप वर्दे, साओ टोमे आणि प्रिंसिपे, गिनी बिसाऊ, मोझांबिक, इक्वेटोरियल गिनी आणि ईस्ट तिमोर या देशांची ती अधिकृत भाषा आहे. या देशांशी भारताचे व्यापारी व सांस्कृतिक संबंध आहेत. तसेच, गोवा येथे पोर्तुगाली संस्कृतीचे ऐतिहासिक वातावरण, त्याचा गोव्यातील कलाजीवनावर असलेला प्रभाव यामुळे तेथील विविध क्षेत्रात पोर्तुगीज भाषेच्या संधी आहेत. तसेच भाषांतर, पर्यटन, उद्योग क्षेत्रात शैक्षणिक व रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

इच्छुकांनी त्वरित विदेशी भाषा विभाग, भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ येथे संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठात संत जगनाडे महाराज जयंती उत्साहात

कोल्हापूर : संत तुकाराम महाराज यांचे शिष्य, लेखनिक संत संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंद, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
लोकमत

# संत जगनाडे महाराजांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संत संताजी जगनाडे यांची जयंती शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली.

संत तुकाराम महाराज यांचे शिष्य संत संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
पुढारी

# विद्यापीठात संत जगनाडे महाराजांची जयंती

कोल्हापूर : संत संताजी जगनाडे यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय येवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
पुण्यनगरी

# विद्यापीठात संत जगनाडे महाराजांची जयंती

**कोल्हापूर :** संत संताजी जगनाडे यांची जयंती शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. संत तुकाराम महाराज यांचे शिष्य असलेले आणि त्यांचे टाळकरी व लेखनिक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेल्या संत संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

0 9 DEC 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना 'वसुंधरा सन्मान'

# किर्लोस्कर महोत्सव बुधवारपासून

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : किर्लोस्कर उद्योग समूह आणि शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवार (ता. १३) ते शुक्रवार (ता. १५) दरम्यान विद्यापीठात 'किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' होणार आहे. यावर्षी महोत्सवात विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना 'वसुंधरा सन्मान', तर डॉ. व्ही. टी. पाटील फौंडेशन, गार्डन्स क्लब, जलमित्र फौंडेशन, पर्यावरण अभ्यासक सुहास वायंगणकर यांना 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती किर्लोस्कर समूहाचे प्रॉडक्शन हेड सुरेश मगदूम आणि विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. विलास शिंदे

'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज' असा विषय घेऊन होणारा यावर्षीच्या चित्रपट महोत्सवाचे उदघाटन विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवनात बुधवारी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, किर्लोस्कर ऑइल इंजिन्सचे सी. जी. रानडे, अमरजित सिंग, महोत्सव प्रमुख वीरेंद्र चित्राव यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. पर्यावरण आणि जलसंवर्धन क्षेत्रात विद्यापीठ परिसर सुजलाम बनविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल कुलसचिव डॉ. शिंदे, तर पर्यावरण रक्षण आणि शाश्वत विकासासाठी योगदान देणाऱ्या सुहास वायंगणकर, डॉ. व्ही. टी. पाटील फौंडेशन, गार्डन्स क्लब, जलमित्र फौंडेशनला पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याचे सुरेश मगदूम यांनी सांगितले. या पुरस्कारांचे शुक्रवारी दुपारी तीन वाजता पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. महोत्सवात ५० हून अधिक लघुपट दाखविण्यात येणार आहेत. त्यासाठी सर्वांना मोफत प्रवेश असल्याची माहिती डॉ. आसावरी जाधव यांनी दिली. यावेळी किर्लोस्कर समूहाचे एचआर विभागप्रमुख धीरज जाधव, सीएसआर व्यवस्थापक शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर, शिवानंद पोळ, मोहन तायडे उपस्थित होते.

### असा होणार महोत्सव

- बुधवारी सकाळी १० वाजता : महोत्सवाचे उद्घाटन
- पर्यावरणपूरक नव तंत्रज्ञान, आहारविषयक संशोधन संकल्पनाचे सादरीकरण : दुपारी १ वाजता
- गुरुवारी सकाळी ८ वाजता : विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनमध्ये क्षेत्रभेट
- दुपारी २. ३० वाजता : डॉ. एम. एस. देशमुख, सुभाष नियोगी, परितोष कंकाळ यांचे मार्गदर्शन
- शुक्रवारी सकाळी ८ वाजता : विद्यापीठातील जलसंधारण कामांची पाहणी, पक्षी निरीक्षण
- दुपारी ३ वाजता : वसुंधरा सन्मान आणि मित्र पुरस्कारांचे वितरण

### फोटोग्राफी, चित्र-शिल्प प्रदर्शन

- महोत्सवानिमित्त 'कॅप्चर द नेचर' ही फोटोग्राफी स्पर्धा आयोजित केली आहे. महोत्सवाच्या ठिकाणी फोटोग्राफी, चित्र-शिल्प, पर्यावरणपूरक सेवा, वस्तूंचे प्रदर्शन भरणार आहे. या महोत्सवात विद्यार्थी, नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन धीरज जाधव यांनी केले.

Scanned with OKEN Scanner

09 DEC 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आजीवन'मध्ये १३० अभ्यासक्रमांची क्रेझ

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील आजीवन व अध्ययन व विस्तार केंद्रात १३० अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. येथून प्रशिक्षण घेतलेल्या अनेकांनी स्वत:चे व्यवसाय उभारले. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, औद्योगिक कर्मचाऱ्यांना या अभ्यासक्रमाचा चांगला उपयोग झाला आहे. एक महिना ते वर्षभरापर्यंत कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमातून प्रशिक्षणार्थींचा सामाजिक, आर्थिक विकास होतो. नाममात्र प्रवेश शुल्कात रोजगरि संधी मिळत असल्याने याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार केंद्रात प्रशिक्षण घेऊन अनेकांनी व्यवसाय सुरू केला आहे. मोडी लिपी आणि इंग्रजी भाषा प्रभुत्वामुळे अनेकांना भाषांतर क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध होत आहे. कमी खर्चात रोजगार मिळत असल्याने या अभ्यासक्रमांविषयी क्रेझ वाढत आहे. स्टार्टअप युगात लहान पण रोजगार देणारे अभ्यासक्रम फायदेशीर ठरत आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमात काळानुरूप बदल करून तंत्रज्ञानाचा वापरही केला जात आहे.



- आजीवन, अध्ययन व विस्तार केंद्रातील चित्र
- अल्प मुदतीत प्रशिक्षण कमी खर्चात रोजगार
- प्रौढांसाठी स्पर्धा, आरोग्य तपासणी

बहुतांश अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्क ३०० रूपयांपासून १ हजार रूपयांपर्यंत असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे सहज शक्य आहे. त्यामुळे तरूणांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वच प्रशिक्षण घेऊन व्यवसायाकडे वळत आहेत. घरातल्या घरात किचन गार्डन, टेरेस गार्डन आणि बाल्कनी गार्डन तयार करून अनेक महिलांनी रोजच्या जेवणात लागणारी कोथींबिर, कडीपत्यासह भाज्यांचा प्रश्न निकाली काढला आहे. काहींनी ब्युटी पार्लर, छोटे-मोठे इव्हेंट, खाद्यपदार्थांचे स्टॉल, प्लंबिंगची कामे सुरू केली आहेत. त्यामुळे अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांकडे गर्दी वाढत आहे.

### नोकरीच्या संधीचीही काळजी

या केंद्रात विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार प्रशिक्षण देवून, त्यांना नोकरीच्या संधी कशा मिळतील याची काळजी घेतली जाते. सातवी व आठवी उत्तीर्ण इच्छुक कोणीही या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे समाजातील विविध घटकांनी हा अभ्यासक्रम पूर्ण करून स्वत:ला नोकरी व रोजगार योग्य बनवावे. कौशल्य विकसित झाल्याने छोटे-मोठे उद्योग, योगा, मेहंदी अभ्यासक्रम सुरू केले आहेत. याद्वारे अनेकांनी आपले छोटे, छोटे व्यवसाय उभारून प्रगतीकडे वाटचाल सुरू केली आहे.

### प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिक्षण

विद्यार्थ्यांनी पदवी व पदव्युतरचे शिक्षण घेतले तरी प्रत्यक्ष कामातला अनुभव मिळतोच, असे नाही. त्यादृष्टीने अल्प मुदतीचे कमी शुल्कात केवळ प्रात्यक्षिकाचे ज्ञान देऊन विद्यार्थ्यांना कौशल्यधारक बनवण्याच्या दृष्टीनें हे अभ्यासक्रम शिकवले जातात. त्याचा विद्यार्थ्यांना चांगलाच लाभ होतो.

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ**

### प्रौढांना मिळतोय आधार...



तंत्रज्ञान युगात ई-बँकींगचे महत्व वाढले आहे. ई-बँकींगमध्ये ज्येष्ठांची फसवणूक होऊ नये म्हणून त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. व्याख्यान, विविध स्पर्धा घेऊन, सातत्याने भेडसावणाऱ्या प्रश्नांपासून दूर ठेवले जाते. उतार वयात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने वृद्धांची आरोग्य तपासणी करून प्रथमोपचार केले जातात. या उपक्रमांचा वृध्दांना चांगला लाभ होत आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
सकाळ

# 'डी.लिट.'साठी सर्वमान्य व्यक्तींच्या प्रस्तावांचा अभाव

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६० वर्षांमध्ये विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी आणि कर्तृत्व सिद्ध केलेल्या मान्यवरांना डी. लिट. ही मानद पदवी देऊन सन्मानित केले आहे. मात्र, गेल्या आठ वर्षांमध्ये मानद पदवीसाठी या व्यक्तिमत्वांच्या उंचीची कामगिरी आणि सर्वव्यापी, सर्वमान्य असलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रस्तावांचा अभाव जाणवत आहे.

विद्यापीठाने गेल्या ५४ वर्षांपूर्वी दीक्षान्त समारंभात मानद पदवी देण्याची परंपरा सुरू केली. त्यात डॉक्टर ऑफ लॉ, डी. लिट., डी. एस्सी या पदवींचा समावेश आहे. सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला-संस्कृती, संशोधन, आदी क्षेत्रांतील २१ कर्तृत्ववान व्यक्तीमत्त्वांना विद्यापीठाने मानद पदवीने सन्मानित केले आहे. त्याने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचा देखील नावलौकीक झाला आहे. मानद पदवी देण्याच्या परंपरेला या कर्तृत्ववान व्यक्तिमत्वांमुळे एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे. त्या व्यक्तिमत्वांच्या उंचीचे आणि सर्वव्यापी काम असलेल्या आणि सर्वमान्य असणाऱ्या व्यक्तींचे मानद पदवीसाठीच्या प्रस्तावांचा अभाव जाणवत आहे. काही प्रस्ताव आले, पण ते सर्वमान्य ठरले नाहीत. त्यातच कोरोनामुळे दोन दीक्षान्त समारंभ ऑनलाईन स्वरूपात झाले. अशा परिस्थितीत मानद पदवीचा विचार करणे प्रशासनाला शक्य झाले नाही.

दरम्यान, विद्यापीठाच्या स्थापनेपासून आतापर्यंत एकूण ६० दीक्षान्त समारंभ झाले आहेत. त्यापैकी केवळ १५ समारंभात मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. बांगलादेशातील ग्रामीण बँकेचे संस्थापक डॉ. महंमद युनूस यांना विद्यापीठाने आठ वर्षांपूर्वी डी. लिट. पदवी जाहीर केली. त्यांनी ही पदवी स्वीकारण्यास सकारात्मकता दर्शविली. मात्र, पदवी स्वीकारण्यासाठी त्यांना काही कारणास्तव अद्याप येता आलेले नाही.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 DEC 2023
सकाळ

# नवनाथ कुंभार यांचे महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसवर नामांकन



नवनाथ कुंभार

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठातील मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, जीवरसायन शास्त्र अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. नवनाथ कुंभार यांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसकडून 'यंग असोसिएट्स' म्हणून नामांकन प्राप्त झाले आहे. डॉ. कुंभार हे कर्करोगावर संशोधन करत आहेत. त्यांनी कर्करोग व स्टुव्हाईट-vसुपर कपॅसिटर या संशोधनावर दोन पेटंट दाखल केले आहेत.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठात मीडिया स्पेक्ट्रमचे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवावर आधारित मीडिया स्पेक्ट्रम विशेषांकाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थ्यांनी हे स्पेक्ट्रम तयार केले.

यावेळी प्र–कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. प्रसाद ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी चित्रपट महोत्सवातून विविध देशातील चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेत्यांशी चर्चा करून माहिती संकलित केली होती.

या सर्व माहितीचे संकलन असलेला हा विशेषांक आहे. चित्रपट महोत्सवात सहभागी झालेल्या साईसिमरन घाशी, मेलीना कालिचुर्ण, सुरज कांबळे, अथर्व यज्ञोपवित, दिव्या कांबळे, सचिन बनसोडे आदी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव सांगितले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2023
लोकमत

# 'स्क्रिप्ट टू स्क्रीन'वर विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मास कम्युनिकेशन विभाग तसेच पद्मश्री डॉ. ग. गो जाधव पत्रकारिता अध्यासन यांच्यातर्फे स्क्रिप्ट टू स्क्रीन या विषयावर आज शनिवारी सकाळी १०:३० ते ४:३० या वेळेत एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. पुणे येथील प्रसिद्ध दिग्दर्शक सुनील नाईक कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या नवीन इमारतीमध्ये होत आहे.

Scanned with OKEN Scanner

0 9 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्क्रिप्ट टू स्क्रीन'वर आज कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्यनिकेशन विभाग आणि पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने स्क्रिप्ट टू स्क्रीन विषयावर शनिवार (दि. ९) रोजी सकाळी १०.३० ते ४.३० या वेळेत एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे.

पुणे येथील दिग्दर्शक, लेखक सुनील नाईक कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या नवीन इमारतीमध्ये होत आहे. कार्यशाळा निशुल्क असून सर्वांसाठी खुली आहे. यात सहभागी होणाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 DEC 2023
पुढारी

# विवेकानंद कॉलेजमध्ये सोमवारी आविष्कार संशोधन महोत्सव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास कक्ष पुरस्कृत कोल्हापूर जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे (महाविद्यालयीन गट) सोमवारी (दि. ११) सकाळी १० वाजता शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे आयोजन करण्यात आले आहे.

मानव्यविद्या, भाषा, कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा सुशासन, विज्ञान, कृषी आणि प्राणीशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र या प्रकारामध्ये आविष्कार संशोधन स्पर्धा होतील. स्पर्धेमध्ये प्रत्येक प्रकारासाठी महाविद्यालयातील दोन विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

या प्रत्येक गटातील पहिले दोन विजेते विद्यापीठ स्तरावरील आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी पाठविले जातील. महोत्सवात जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास कक्षाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 DEC 2023
सकाळ

# अनुष्का पाटीलची नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर :** अनुष्का पाटीलची नवी दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय नेमबाजी स्पर्धेमध्ये अनुष्काने १० मीटर पिस्तल व २५ मीटर स्पोर्टस् पिस्तल या दोन्ही गटांत वर्चस्व मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला होता. या निवडीबद्दलताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, माजी शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. सुनीता काळे, शारीरिक शिक्षण संचालिका ज्योती लेंगरे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner